महाराष्ट्र अॅक्युपंक्चर परिषद, मुंबई
Maharashtra Council of Acupuncture
202, 2nd Floor, Administrative/ Superintendent office Bldg, Cama and Albless Hospital, Mahapalika Marg, Mumbai 400 001
Tel. : 022-22620376 | Email : mahacucouncil@gmail.com | Web : www.mahacucouncil.org

क्र.मअॅप/अॅक्यू. पदविका मान्यता/महालक्ष्मी अॅक्यू.सातारा/ ११२८/ २०२४     दिनांक-२४/०९/२०२४

प्रति,
अध्यक्ष/ सचिव,
सौ.देवीबाई नारायणदास छाबडा ग्रामिण शिक्षण संस्था ,
संचलित महालक्ष्मी अॅक्यूपंक्चर कॉलेज,
सर्वे नं.२५९ मु. पो.रायगाव,ता.जावली, जि.सातारा

विषय - नवीन अॅक्युपंक्चर चिकित्सा पदविका अभ्याक्रम सुरु करण्यासाठी मान्यता देण्याबाबत.
सौ. देविबाई नारायणदास छाबडा ग्रामिण शिक्षण संचलित महालक्ष्मी कॉलेज ऑफ अॅक्यूपंक्चर थेरपी,रायगाव, सातारा.

संदर्भ - १. महाराष्ट्र अॅक्यूपंक्चर चिकित्सा पध्दती अधिनियम २०१५
२. महाराष्ट्र अॅक्यूपंक्चर परिषद नियम २०१९
३. संस्थेचे सक्षमता तपासणी पत्र क्र. मअॅप/अॅक्यू.सक्षमता तपासणी/६६३/२०२४ दि.१७/०१/२०२४ चे पत्र
४. सक्षमता तपासणी समितीचा अहवाल दिनांक-२३/०१/२०२४
५. वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,मुंबई यांचे पत्र क्र. १३७/२२/शिक्षण १ दिनांक- ०५/०९/२०२४

प्रस्तावना-

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अॅक्यूपंक्चर परिषद चिकित्सा पद्धती अधिनियम २०१५, च्या कलम ३५ अन्वये महाराष्ट्र अॅक्यूपंक्चर परिषदेची स्थापना केलेली आहे. त्याचप्रमाणे शासनाने महाराष्ट्र अॅक्यूपंक्चर परिषद नियम २०१९, दिनांक २० सप्टेंबर, २०१९ रोजी प्रसिद्ध केलेले आहेत. उक्त अधिनियमातील प्रकरण तीन मधील नियम १५ अनुसार तसेच शासनाच्या संदर्भ क्र.५ च्या पत्रातील निर्देशानुसार महाराष्ट्र अॅक्यूपंक्चर परिषदेस नवीन अॅक्यूपंक्चर चिकित्सा पदविका अभ्यासक्रम (Diploma in Acupuncture Therapy) सुरू करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. या तरतुदीस अनुसरून महाराष्ट्र अॅक्यूपंक्चर परिषदेमार्फत राज्यात नवीन अॅक्यूपंक्चर चिकित्सा पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यास स्वारस्य असलेल्या संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. या प्रस्तावातील सौ. देविबाई नारायणदास छाबडा ग्रामिण शिक्षण संचलित महालक्ष्मी कॉलेज ऑफ अॅक्यूपंक्चर थेरपी,रायगाव, सातारा या संस्थेच्या प्रस्तावाची किमान पात्रता निकषानुसार सक्षमता तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

२. सदर संस्थेची सक्षमता तपासणी परिषदेच्या संदर्भ क्र.३ नुसार परिषदेने नियुक्त केलेल्या सक्षमता तपासणी समितीमार्फत करण्यात आली. सक्षमता तपासणी समितीने त्यांचा मुल्यांकन अहवाल संदर्भ क्र.४ च्या पत्रान्वये परिषदेस सादर करण्यात आला. सक्षमता तपासणी समितीने वरील संस्था नवीन अॅक्यूपंक्चर चिकित्सा पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यास सक्षम असल्याची शिफारस केलेली आहे.

या अनुषंगाने उक्त संस्थेत शैक्षणिक वर्ष २०२४- २५ करिता ५० (पन्नास) विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह नवीन ॲक्यूपंक्चर चिकित्सा पदविका अभ्यासक्रम (Diploma in Acupuncture Therapy) सुरू करण्यास परवानगी देण्याची बाब परिषदेच्या विचाराधीन होती.

<u>निर्णय-</u>

परिषदेने नियुक्त केलेल्या सक्षमता तपासणी समितीने संदर्भ क्र.४ च्या पत्रान्वये मुल्यांकन अहवाल परिषदेस सादर केलेला आहे. सदर शिफारशीसह सादर केलेला मुल्यांकन अहवाल विचारात घेऊन सौ. देविबाई नारायणदास छाबडा ग्रामिण शिक्षण संचलित महालक्ष्मी कॉलेज ऑफ ॲक्यूपंक्चर थेरपी,रायगाव, सातारा या संस्थेस सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह नवीन ॲक्युपंक्चर चिकित्सा पदविका अभ्यासक्रम (Diploma in Acupuncture Therapy) सुरू करण्यास सोबतच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून परिषद मान्यता प्रदान करीत आहे.

सदर संस्थेस नवीन ॲक्युपंक्चर चिकित्सा पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मान्यतेचे पत्र (Letter of Permission) महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषद चिकित्सा अधिनियम २०१५ नुसार परिषदेस असलेल्या प्रदत्त अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

(नारायण नवले)
प्रबंधक
महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषद

प्रत सविनय सादर,

१. मा. मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई
२. मा. राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे खाजगी सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई
३. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग गो.ते. रूग्णालय संकुल नविन मंत्रालय, मुंबई
४. मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व आयुष, मुंबई
५. मा. कार्यालयीन नस्ती

अटी व शर्ती -:

१. सदर अभ्यासक्रमाचे प्रवेशा करिता राज्य शासन ,केंद्र शासन,मा उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कार्यपद्धती अवलंबविणे बंधनकारक राहील.

२. केंद्र शासन/ महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषद यांनी वेळोवेळी ॲक्यूपंक्चर चिकित्सा पदविका अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संबधित संस्थेस बंधनकारक राहील.

३. भविष्यात केंद्र सरकारच्या पातळीवर ॲक्युपंक्चर परिषद अस्तित्वात आल्यास त्यांनी घातलेल्या अटींची पुर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

४. महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट १९८७ मधील तरतुदीचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे संस्थेस आवश्यक राहील.

५. ॲक्यूपंक्चर चिकित्सा पदविका अभ्यासक्रम (Diploma in Acupuncture Therapy) शासनाने अद्याप व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित केला नसल्याने या अभ्यासक्रमासाठी प्रवेशीत विद्यार्थ्यांना राज्य अथवा केंद्र शासनाकडून शिष्यवृत्ती प्राप्त होणार नाही.

६. सदर अभ्यासक्रम व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित झाल्यानंतर शासकीय नियम / अधिनियमाच्या आधारे तसेच मा. सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय यांनी दिलेल्या निर्णयानुसार वेळोवेळी शैक्षणिक शुल्कासाठी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून त्यानुसार शैक्षणिक शुल्क निश्चित करणे संस्थेस बंधनकारक राहील.

७. परिषदेने शासन मान्यतेच्या अधीन राहून सन २०२४- २५ करिता या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तात्पुरत्या स्वरूपात रू.७५०००/- (रुपये पंच्याहत्तर हजार) प्रति वर्ष एवढे तदर्थ शैक्षणिक शुल्क निर्धारित केलेले आहेत.

८. सदर संस्थेस मान्यतेचे पत्र मिळाल्यानंतर संस्थेची परिषदेकडे नोंदणी करण्यासाठी रू.२ लाख शुल्क भरणे आवश्यक आहे.

९. महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषदेने ॲक्यूपंक्चर अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या प्रमाणकांची योग्यरित्या पुर्तता करून संस्थेने दरवर्षी परिषदेची मान्यता मिळविणे आवश्यक राहील.

१०. संस्थेस विना अनुदानीत तत्वांवर मान्यता देण्यात येत असल्याने सदर संस्था आवर्ती / अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी परिषदेकडे किंवा शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही.

११. सदर अभ्यासक्रमासाठी विहीत केलेल्या निकषांची पुर्तता संस्थेमार्फत होत असल्याची खात्री झाल्यानंतर महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषदेतर्फे सदर संस्थेने विहीत शुल्क रू.५०,०००/- भरना

केल्यानंतर संलग्नता प्रदान करण्यात येईल. सदर संलग्नता परिषदेकडून मिळाल्यानंतरच संस्थेने विद्यार्थी प्रवेशीत करावेत.

१२. सदर संस्थेस कोणत्याही परिस्थितीत परिषदेने / शासनाने मान्य केलेल्या प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करता येणार नाहीत.

१३. संस्थेने प्रवेशीत केलेल्या विद्यार्थ्यांचे परिषदेच्या संकेतस्थळावरून ऑनलाईन एनरोलमेंट करणे आवश्यक राहील.

१४. संस्थेने गुणवत्तेवर आधारीत प्रवेशीत केलेल्या विद्यार्थ्याच्या यादया परिषदेकडून मंजुर करून घेणे बंधनकारक आहे.

१५. प्रवेशीत विद्यार्थ्यांनी नियमानुसार सदर अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर पात्र विद्यार्थ्यांची शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार परिषदेमार्फत परिक्षा घेण्यात येईल.

१६. सदर संस्थेने विद्यार्थी प्रवेशीत केल्यापासून सुरुवातीच्या ३ वर्षासाठी भाडयाने / भाडेपट्टीवर घेतलेल्या इमारतीत ॲक्युपंक्चर संस्था चालविण्यास मान्यता देण्यात येईल. तथापि ३ वर्षांनंतर संस्थेने स्वतःच्या इमारतीत ॲक्युपंक्चर अभ्यासक्रम चालविणे बंधनकारक राहील. अन्यथा संस्थेस परिषदेने निर्धारीत केलेला दंड भरावा लागेल.

(नारायण नेवले)
प्रबंधक
महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषद